N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** अहमदनगर **P.S.(ठाणे):** संगमनेर शहर **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0344 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 04/07/2021 04:21 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शनिवार

**Time Period (कालावधी):** पहर 7

**Date From (दिनांक पासून):** 03/07/2021
**Date To ( दिनांक पर्यंत):** 03/07/2021
**Time From (वेळेपासून):** 19:21 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 19:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 04/07/2021 **Time (वेळ):** 04:07 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 006 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 04/07/2021 04:07 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 1 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** ऑरेन्ज कॉर्नर संगमनेर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री. विजय रामचंद्र कु-हाडे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1981 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**



Scanned with CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | आळेफाटा ता जुन्न्र जि पुणे,संगमनेर शहर ,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | आळेफाटा ता जुन्नर जि पुणे,संगमनेर शहर ,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विशाल किसन बोहाडे | | | 1. हुमान शरण आपर्टमेन्ट संगमनेर, संगमनेर शहर ,अहमदनगर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 40,000/ रुपये लाचेची मागणी | 40,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 40,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादसंगमनेर जि.अहमदनगरदि. 04/07/2021मी श्री. विजय रामचंद्र कुहाडे वय-40 वर्षे धंदा- नोकरी (शिक्षक) रा. मु.पो. आळेफाटा ता. जुन्न्र जि. पुणे मो. नं. 9422307994, 8669022714 समक्ष फिर्याद देतो की,मी वरिल पत्यावर कुटं◌ूबासह राहण्यास असुन मी दि. 03/07/2021 रोजी अन्टी करप्षन ब्युरो, अहमदनगर युनिट कार्यालयातील श्री. हरिष खेडकर पोलीस उपअधीक्षक, अन्टी करप्षन ब्युरो, अहमदनगर यांचेषी संपर्क करून त्यांना एका लोकसेवका विरूध्द लाचमागणीची तक्रार सांगितली. त्याप्रमाणे पोलीस उपअधीक्षक श्री. खेडकर यांनी मला बोटा येथे सुरक्षित ठिकाणी वाहानासह व लाच म्हणून देण्याचे रकमेसह हजर राहणेबाबत कळविले. त्यानंतर पोलीस अधीक्षक श्री. खेडकर, सापळा पथक व पंच असे बोटा येथे 14.15 वा.चे सुमारास सुरक्षित स्थळी पोहोचले. मी त्यांना व त्यांचेसोबतचे अधिकारी, कर्मचारी व पंच साक्षीदार यांना माझी ओळख सांगितली. पोलीस उपअधीक्षक श्री खेडकर यांनी त्यांची स्वतःची,सां◌ेबतचे अधिकारी, कर्मचारी व पंच यांची ओळख करून दिली. तेथे श्री. खेडकर यांनी मला माझी तक्रार थोडक्यात सांगण्यास सांगितले असता मी माझी तक्रार तोंडी सांगितली ती अशी, ष्माझा मावसभाऊ श्री.राजेंद्र श्रीपत कुहाडे यांचे नावे मौजे डोळासणे, ता.संगमनेर, जि.अहमदनगर येथे गट नं.160 मध्ये 1 हेक्टर, 54 आर जमीन आहे. सदर जमीन ही पूर्वी वनविभागाचे क्षेत्रात असल्याने तिचे नियमनाकुलन होण्यासाठी प्रस्ताव मी श्री.राजेंद्र कुहाडे यांचा जनरल मुखत्यार या नात्याने जिल्हाधिकारी अहमदनगर याच्याकडे दाखल केला आहे. त्यासंबधाने सदर जमीनीचे निर्वनीकरण विषयी अभिप्रायासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांजकडुन पत्र उपविभागीय वन अधिकारी, संगमनेर यांना दिलेले आहे. त्या संबंधाने मी मागील आठवडयात उपविभागीय वन अधिकारी, संगमनेर श्री.विशाल बोहाडे यांची भेट घेतली असता त्यांनी मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना अनुकुल अभिप्राय देण्यासाठी माझ्याकडे एक लाख रुपयाची मागणी करुन तडजोडीअंती चाळीस हजार रुपये लाचेची मागणी केली आहे. मला त्यांना लाच देण्याची इच्छा नाही. श्री.विशाल बोहाडे हे मला आज रोजी बोटा येथे भेटणार आहेत. त्यावेळी त्यांनी माझेकडे वरील कामासंबंधाने लाचेची मागणी केल्यास त्यांचेविरुध्द कायदेशीर कारवाई करावी. श्री.बोहाडे यांचेशी माझा आर्थिक देण्या घेण्याचा तसेच उसनवारीचा व्यवहार नाही व त्यांचेशी भाडणतटा, वैर नाही. मला त्यांना लाच देण्याची ईच्छा नाही तरी त्यांचेवर कायदेशिर कारवाई करावी अषी तक्रार सांगितली. त्यानंतर पोलीस उपअधीक्षक श्री. खेडकर यांनी मला माझा◌ी तक्रार माझे हस्ताक्षरात लिहून देणेबाबत कळविले असता, मी माझी वरील प्रमाणे कथन केलेली तक्रार माझे स्वहस्ताक्षरात लिहुन दिली. त्यानतर मी विशाल किसन बोहाडे, सहायक वन संरक्षक, सहायक वनसंरक्षक कार्यालय, संगमनेर यांचे विरूध्द नोंदविलेल्या लाचमागणी तक्रारीची पडताळणी करण्याचे ठरले. पोलीस उपअधीक्षक श्री. खेडकर यांनी लाचमागणी पडताळणी कारवाईत व्हाईस रेकार्डरचा वापर करण्यात देणार असले बाबत कळवून त्याचा वापराबाबत व हातळणीबाबत माहिती समजावून



Scanned with CamScanner

सांगितली. त्यानंतर पोलीस उपअधीक्षक श्री. खेडकर यांनी व्हाईस रेकार्डर मध्ये एक नविन मेमरीकार्ड घालून, व्हाईस रेकार्डर चालू करून, त्या मेमरीकार्डमध्ये काहीही रेकार्ड नसल्याची माझी व दोन्ही पंचाची खात्री करून दिली. त्यानंतर पोलीस उपअधीक्षक श्री. खेडकर यांनी लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाई बाबत मला व पंच नं.1 यांना सुचना समजावुन सांगितल्या, त्यानंतर श्री. खेडकर यांचे सुचनेवरून मी माझे मोबाईलवरून बोहाडे यांचे मोबाईलवर फोन करून बोटा येथे कोठे भेटायचे याबाबत विचारले असता त्यांनी त्यांचे बोटा येथे येण्याचे रदद झाल्याचे सांगितले त्यावेळी मी त्यांना संगमनेर येथे येवुन भेटु का असे विचारले असता त्यांनी होकार दिला. त्यानंतर आम्ही सर्व बोटा येथुन निघुन संगमनेरचे अलीकडे सुरक्षित ठिकाणी आलो. त्यावेळी मी पुन्हा बोहाडे यांना फोन लावुन संगमनेर येथे आलो असल्याचे कळविले तेव्हा त्यांनी मला आंरेज कार्नर येथे येण्यास सं◌ागितले त्याप्रमाणे श्री. खेडकर यांनी व्हाईस रेकार्डर चालु करून देवुन पंच नं 1 यांचेसह माझे कारने रवाना केले त्याप्रमाणे मी बोहाडे यांची संगमनेर येथील आरं◌ेज कार्नर येथे भेट घेतली असता त्यांनी जमिनीच्या निर्वनीकरणाचा अहवाल जिल्हाधिकारी यांना पाठविण्याकरीता माझेकडे लाचेची मागणी करून मी तक्रारीत नमुद केल्याप्रमाणे 40,000/- रूपये लाच मागणी करून ती रक्कम उदया सकाळी लवकर आळेफाटा येथे स्विकारण्याचे कबुल केले. त्यानंतर मी पंच नं. 1 सह सुरक्षित ठिकाणी परत आलो. श्री. खेडकर यांनी पंचासमक्ष माझेत व बोहाडे यांचेत ध्वनिमुद्रित झालेले संभाषण ऐकुन व पंच नं.1 यांना विचारणा करून लाच मागणीबाबतची खात्री केली. बोहाडे यांनी माझेकडे लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाल्याने व ती रक्कम उदया सकाळी लवकर आळाफाटा येथे पान नं. 02स्विकारणार असल्याने वेळेच्या कमतरतेमुळे सापळापुर्व पंचनाम्याची कारवाई संगमनेर येथे करण्याचे ठरले. मी लाच म्हणुन देण्यासाठी हजर केलेल्या नोटांना अ.पा. लावुन प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. त्याप्रमाणे सापळापुर्व कारवाईचा पंचनामा सुरू असतांना मला बोहाडे यांनी सायंकाळी 06/10 वा. चे सुमारास व्हाटसअप काल केला व लाचेची रक्कम स्विकारण्यासाठी एक तासाभरात आळेफाटा येथे येणार असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे बोहाडे यांचेविरूध्द आळेफाटा येथे सापळा कारवाई आयोजित करण्याचे ठरवुन अ.पा लावलेल्या लाचेच्या नोटा माझ्या शर्टाचे छातीवरील खिशात ठेवुन आवश्यक त्या सुचना देण्यात आल्या त्यानंतर मी व सापळा पथक असे आपआपले वाहनाने संगमनेर येथुन आळेफाटा येथे सुरक्षित स्थळी पोहोचलो. त्यानंतर सायंकाळी 7.12 वा.चे सुमारास बोहाडे यांनी मला फोन करून आळेफाटा चैकात आल्याचे सांगितले त्याप्रमाणे बोहाडे यांचेविरूध्द आळेफाटा चैकात लाचेचा सापळा आयोजित करण्याचे ठरवुन मला व्हाईस रेकार्डर व लाचेच्या रकमेसह माझे वाहानातुन रवाना केले. त्याप्रमाणे मी बोहाडे यांची आळेफाटा चैकात भेट घेण्यासाठी गेलो असता बोहाडे हे त्यांची कार क्रं. एम.एच 31 एफई 3743 मधुन उतरून माझे गाडीत बसुन चहा घेण्यासाठी आले व लाचेची रक्कम माझेकडुन स्विकारली असता त्यांना सायंकाळी 07.21 वा.चे सुमारास पकडण्यात आले. लाचेची रक्कम रूपये 40,000/- बोहाडे यांनी स्विकारून माझे कारचे आतील डशबोर्डचे ड्रावरमध्ये ठेवली होती ती पंचासमक्ष जप्त करण्यात आली आहे. त्यानंतर पुढील आवश्यक त्या तपासण्या करून पंचनाम्याचे पुढील कामकाज संगमनेर येथील शासकिय विश्रामगृह येथे करण्याचे ठरले त्याप्रमाणे मी माझे कारने व सापळा पथक लोकसेवक बोहाडे यांचेसह शासकिय वाहानाने संगमनेर येथील शासकिय विश्रामगृह येथे आलो व त्याठिकाणी सापळा कारवाईचे कामकाज करण्यात आले.. तरी यातील लोकसेवक श्री. विशाल किसन बोहाडे, वय-40 वर्षे, धंदा-नोकरी, सहाय्यक वनसंरक्षक वर्ग-1, सहाय्यक वनसरक्षक कार्यालय, संगमनेर जि. अहमदनगर सध्या रा. फ्लट नं. 2, हनुमान शरण अपार्टमेंट, संगमनेर मुळ रा. मु.पे◌ा. घोडेगाव ता. आंबेगाव जि. पुणे यांनी माझे मावसभाऊ राजेंद्र कुहाडे यांचे नावे डोळासणे येथे असलेली गट नं. 160 मधील जमीन पुर्वी वनविभागाचे क्षेत्रात असल्याने तिचे नियमाकुलन होण्यासाठी जिल्हाधिकारी,अहमदनगर यांचेकडे दाखल केलेल्या प्रस्तावा सबंधाने सदर जमिनीचा निर्वनीकरणाविषयी अभिप्राय जिल्हाधिकारी कार्यालय,अहमदनगर यांचेकडे पाठविण्यासाठी माझेकडे दिनांक 03/07/2021 रोजी आयोजित लाच मागणी पडताळणी दरम्यान पंच साक्षीदारांसमक्ष 40,000/- रूपये लाचेची मागणी करून ती लाचेची रक्कम दिनांक 03/07/2021 रोजी सायंकाळी 07.21 वा.चे सुमारास आळेफाटा चैकातील कल्याण रोडवरील कृष्णा डेअरी फार्म व वडा पाव,टी सेंटर समोर आयोजित सापळा कारवाईत माझेकडुन स्विकारून स्वताचा संपात्तीक फायदा करून घेवुन गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले म्हणुन माझी म्हणून लोकसेवक श्री. विशाल किसन बोहाडे, वय-40 वर्षे, धंदा-नोकरी, सहाय्यक वनसंरक्षक वर्ग-1, सहाय्यक वनसरक्षक कार्यालय, संगमनेर जि. अहमदनगर वर्ग 1 यांचे विरूध्द कायदेशीर फिर्याद आहे. ( विजय रामचंद्र कुहाडे )

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Mukund Kashinath Deshmukh(I (Inspector)) / PI **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
**Rank (पद):**
**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**
**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**
**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**



Scanned with CamScanner

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

पोलीस ठाणे अंमलदार
संगमनेर शहर पोलीस ठाणे
जि. अहमदनगर

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची**

**Name (नाव):** Mukund Kashinath Deshmukh
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PI



Scanned with CamScanner